महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४४२(२)(२)/२०१९/तेवीस दिनांक : १४ डिसेंबर, २०२१.

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- राज्यकर निरीक्षक, महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा-२०१९, पदसंख्या व आरक्षणातील बदलाबाबत.**

संदर्भ :- (१) जाहिरात क्रमांक: ०१/२०१९, दिनांक ९ जानेवारी, २०१९.
(२) अधिसूचना क्रमांक: एनओटी-३६१८/सीआर-३१/२०१८/तीन, दिनांक २१ जून, २०१९.
(३) घोषणा क्रमांक: एएसपी-०३१९/सीआर-५३अ/२०१८/तीन, दिनांक ७ नोव्हेंबर, २०१९.

महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या अधिपत्याखालील राज्य कर निरीक्षक संवर्गातील पद भरतीकरीता दिनांक ९ जानेवारी, २०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (पूर्व) परीक्षा-२०१९ ही परीक्षा दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी घेण्यात आली. तसेच संदर्भांकित अधिसूचनेस अनुलक्षून विषयांकित पदाकरीता मुख्य परीक्षा दिनांक २८ जुलै, २०१९ व दिनांक २४ ऑगस्ट, २०१९ रोजी घेण्यात आली. प्रस्तुत मुख्य परीक्षेचा निकाल दिनांक २७ डिसेंबर, २०१९ रोजी जाहिर करण्यात आला.

२. सामाजिक व शैक्षणिकदृष्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ५ मे, २०२१ रोजीच्या न्यायानिर्णयानुसार सदर प्रवर्गाचे आरक्षण रद्दबातल ठरविण्यात आल्यामुळे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: बीसीसी-२०२०/प्र.क्र.३२०/१६-ब, दिनांक ५ जुलै, २०२१ अन्वये भरती प्रक्रिया राबविण्यासंदर्भात शासनाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाकरीता आरक्षित असलेली पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरीत करुन संबंधित परीक्षेची निकाल प्रक्रिया राबविणे क्रमप्राप्त ठरते.

३. प्रस्तुत दिनांक ५ जुलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींच्या आधारे सामाजिक व शैक्षणिकदृष्या मागास प्रवर्गाकरीता आरक्षित पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरीत केल्यानंतर विषयांकित राज्य कर निरीक्षक, महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा-२०१९ मधून भरावयाच्या एकूण ३५ पदांचा सुधारित तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| राज्य कर निरीक्षक, महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा-२०१९ (एकूण ३५ पदे) | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | **अ.जा.** | **अ.ज.** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** | **वि.मा.प्र.** | **एकूण आरक्षित पदे** | **अराखीव पदे** | **एकूण पदे** |
| **पदसंख्या** | ७*+१ | ३* | १ | -- | १* | १ | ४ | १ | १९ | १६ | ३५ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:-** | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | ६ | २ | १ | -- | १ | १ | ३ | १ | १५ | ११ | २६ |
| **महिला** | २ | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | ४ | ५ | ९ |
| **दिव्यांग** | **एकूण पदे ३- (१) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू-१ (२) श्रवण शक्तीतील दोष-१ (३) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी-१** | | | | | | | | | | |
| ***अनुशेषाची पदे** | | | | | | | | | | | |

४. सामाजिक व शैक्षणिकदृष्या मागास प्रवर्गाच्या ज्या उमेदवारांनी अराखीव प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेली वयोमर्यादा ओलांडली असेल त्यांनी वयोमर्यादेतील सवलतीकरीता तद्अनुषंगिक प्रमाणपत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे अनिवार्य राहील.

५. उपरोक्त सुधारित पदसंख्या व तरतुदींआधारे विषयांकित राज्य कर निरीक्षक, महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा-२०१९ करीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

ठिकाण- मुंबई

उप सचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.